# उसाची पळवापळवी : प्रवरा व संगमनेरला ऊस न देण्याचे भानुदास मुरकुटेंचे आवाहन



**नगर :** नगर जिल्ह्यात साखर कारखान्यांना उसाची उपलब्धता कमी आहे. त्यामुळे येथील अशोक साखर कारखान्याच्या कार्यक्षत्रातील उसाची संगमनेर आणि प्रवरा साखर कारखान्यांनी तोडणी सुरू केली आहे. कारखान्याचे अध्यक्ष माजी आमदार भानुदास मुरकुटे यांनी शेतकरी व सभासदांना श्रीरामपूर तालुक्याची कामधेनु वाचविण्याची मागणी केली आहे.यासंदर्भात प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात मुरकुटे यांनी महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्यावर टीका केली आहे. श्रीरामपूर तालुक्याचे हक्काचे पाणी पळविणाऱ्या आणि या भागाचे वाळवंट करण्यासाठी टपलेल्या या नेत्यांच्या कारखान्यांना शेतकऱ्यांनी ऊस देऊ नये.महसूलमंत्री विखे पाटील व माजी मंत्री थोरात यांचे श्रीरामपूर तालुक्याच्या ऊस उपलब्धता वाढीसाठी कोणतेही योगदान नाही. त्यामुळे 'अशोक'च्या सभासद शेतकऱ्यांनी प्रवरा व संगमनेर कारखान्यास ऊस न देता आपल्या भागाची कामधेनु असणाऱ्या अशोक कारखान्यासच ऊस पुरवावा, असे आवाहन माजी आमदार भानुदास मुरकुटे यांनी केले आहे.मुरकुटे यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, विखे व थोरातांनी आपल्या भागाचे पाणी पळविले. मी आमदार असताना विखेंनी प्रवरा परिसरात डाव्या कालव्यावर आडवे बांध घातले होते. ते मी सुरुंग लावून उद्ध्वस्त केले. प्रवरा डावा कालव्याचे नूतनीकरण करून वहन क्षमतेत दीडपट वाढ केली. हजारो एकराचे रद्द झालेल्या ब्लॉकचे फेरवाटप करून आपल्या भागाचे पाटपाणी संरक्षित केले.

अशोक कारखान्याच्या माध्यमातून कार्यक्षेत्रातील ओढ्या-नाल्यांवर बंधाऱ्यांची मालिका उभारून पाणी उपलब्धता वाढविली. या सर्वांमुळे कार्यक्षेत्रातील उसाच्या उपलब्धतेत ३६ हजार टनवरून बारा लाख टनपर्यंत वाढ झाली. या उसावर प्रवरा व संगमनेर कारखान्याचा डोळा आहे. दोघेही नेते सत्तेच्या जोरावर आपल्या भागावर सतत अन्याय करतात, असा आरोप मुरकुटे यांनी केला.

# आयुष्मान कार्ड काढण्यात नगर राज्यात पहिल्या स्थानावर

## गेल्या सहा महिन्यांत काढले १० लाख कार्ड



**अहमदनगर:** ज्यांच्याकडे आयुष्मान कार्ड आहे त्यांना पाच लाखांपर्यंत मोफत उपचार शासनाकडून दिले जात आहेत. पहिल्या टप्प्यात नगर जिल्ह्यातील ३१ लाख ६५ हजार जणांना हे कार्ड वाटपाचे उद्दिष्ट आहे. त्यापैकी आतापर्यंत एकूण १३ लाख ७६ हजार कार्ड वाटून झाले आहे. दरम्यान, या योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात म्हणजे गेल्या सहा महिन्यांत नगर जिल्ह्याने १० लाख कार्ड वाटले आहेत. राज्यात हा आकडा सर्वाधिक आहे. शासनाने आता पंतप्रधान जनआरोग्य योजना व महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजना अशा दोन्ही योजना एकत्र करून एकच आयुष्मान कार्ड वाटप सुरू केले आहे. यावर कुटुंबातील सदस्यांना ५ लाखांपर्यंतचे उपचार मोफत मिळणार आहेत. दरम्यान हे कार्ड काढण्याची मोहीम २०१८ पासूनच सुरू आहे; मात्र तेव्हा त्याला एवढा प्रतिसाद नव्हता. नंतर शासनाने १५ सप्टेंबर २०२३ मध्ये या योजनेत आणखी लाभ जोडून योजनेचा दुसरा टप्पा जाहीर केला. या दुसऱ्या टप्प्यात जिल्ह्यात तब्बल १० लाख कार्ड वाटप झाले. हा आकडा राज्यात सर्वाधिक असून नगर जिल्हा राज्यात पहिल्या स्थानावर आहे.कागदपत्रे काय लागतात?

'आयुष्मान भारतयोजना' ही केंद्र सरकारची आरोग्य योजना आहे. या योजनेचे कार्ड काढण्यासाठी आधारकार्ड, आधार सोबत लिंक मोबाइल क्रमांक लागतो. आयुष्मान पद्वारे आपण स्वतःचे आयुष्मान कार्ड बनवू शकता.

**पाच लाखांपर्यंत मोफत उपचार**

नगर जिल्ह्यात ३१ लाख ६५ हजार नागरिकआयुष्मान भारतप्रधानमंत्री योजनेचे लाभार्थी असून, आता महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजना, राज्यातील सर्व शिधापत्रिकाधारक कुटुंबे व अधिवास प्रमाणपत्रधारक कुटुंबांना लागू करण्यात येणार आहे. ही संख्या ४७ लाखांपर्यंत आहे. त्यांनाही पुढील टप्प्यात हा लाभ मिळणार आहे.

कोठे काढाल कार्ड?

तुमच्या जवळच्या सीएससी केंद्रावर जाऊन तुमच्या अंगठ्याचा ठसा देऊन आयुष्मान कार्ड काढू शकता. यात तुम्हाला सीएससी केंद्रावरील केंद्रचालक मदत करतील. आयुष्मान कार्ड बनविण्यासाठी आशा सेविका आणि योजनेच्या मान्यताप्राप्त रुग्णालयाला भेट द्यावी. त्यानंतर संबंधित कार्ड आशा सेविकांमार्फत आपल्या घरी पोहोच केले जाईल; तसेच आयुष्यमान पवरही स्वत: कार्ड काढता येते.

**काय आहे आयुष्मान भारत कार्ड?**

आयुष्मान भारत योजना ही केंद्र सरकारची आरोग्य योजना आहे. या योजनेअंतर्गत सरकार नागरिकांना 'आयुष्मान भारत गोल्डन कार्ड' प्रदान करते. या योजनेअंतर्गत आयुष्मान भारत गोल्डन कार्डद्वारे १२०९ उपचारांकरिता प्रतिकुटुंब पाच लाख रुपयांपर्यंतचे उपचार नागरिक मोफत मिळवू शकतात.रुग्णालयात कोणतीही समस्या असल्यास आरोग्य मित्राला भेटून लाभ घेता येतो. आयुष्मान कार्ड (ई-कार्ड), फोटो ओळखपत्र (आधारकार्ड) जनआरोग्य योजनेतून रुग्णावर पूर्णपणे मोफत उपचार केले जात आहेत. योजनेत समाविष्ट असलेले रुग्णालय रुग्णांकडून पैसे मागत असेल तर त्या रुग्णालयातील आरोग्य मित्रांकडे तक्रार करावी.

# 'जातपीळ' कादंबरीचे प्रकाशन जयवंत भिसे अण्णाभाऊंचे साहित्यिक वारस : डॉ. श्रीपाल सबनीस



**सातारा :** जयवंत भिसे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचा वारसा सांगणारे व जातीअंताचे स्वप्न पाहणारे विवेक वादी सच्चे आंबेडकरवादी लेखक आहेत, असे मत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष, ज्येष्ठ विचारवंत, साहित्यिक डॉ.श्रीपाल सबनीस यांनी व्यक्त केले.

डॉ . श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते जयवंत भिसे यांच्या 'जातपीळ' कादंबरीचे प्रकाशन संबोधी प्रतिष्ठानच्या वतीने येथील नगर वाचनालयाच्या पाठक हॉलमध्ये करण्यातआले. त्याप्रसंगी ते बोलत होते. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी संबोधी प्रतिष्ठानचे अध्यक्ष दिनकर झिंब्रे होते. विचार मंचावर संस्कृती प्रकाशनच्या प्रकाशक व पुणे येथील महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या प्रमुख कार्यवाह सुनीताराजे पवार, प्रमुख पाहुणे ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकिहाळ, लेखक जयवंत भिसे, संबोधी प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष रमेश इंजे, कार्यवाह ड. हौसेराव धुमाळ, कोषाध्यक्ष केशवराव कदम उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते लेखक जयवंत भिसे व त्यांच्या पत्नी शीला यांचा सत्कार करण्यात आला. ज्येष्ठ कवी साहित्यिक प्रमोद कोपर्डे व प्रसिद्ध साहित्यिक डॉ. राजेंद्र माने , महाराष्ट्र साहित्य परिषद पुणेचे प्रतिनिधी शिरीष चिटणीस यावेळी उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे किशोर बेडकिहाळ म्हणाले, जयवंत भिसे यांच्या रूपाने मराठी साहित्याला चांगला कादंबरीकार मिळाला आहे. त्यांची कादंबरी पहिलीच असली तरी तसे कुठेही जाणवत नाही. आजच्या काळात सामान्य माणसांच्या जगण्याचे प्रश्न तीव्र झाले आहेत. त्यावर आता त्यांनी पुढील कादंबरी लिहावी.

डॉ. श्रीपाल सबनीस आपल्या भाषणात पुढे म्हणाले, जयवंत भिसे यांची' जातपीळ' ही कादंबरी उत्तम कलाकृती आहे.

जात अस्मिता,ग्रामीण वास्तवाचे सूक्ष्म आकलन व मानवी प्रवृत्ती आणि स्वभावाचे उत्तम निरीक्षण यामुळे ही कादंबरी प्रभावी झाली आहे. बहुतांश लेखक कळत नकळत जातीपातीचे व जात जाणिवेची बळी पडलेले दिसून येतात. लेखकांनी मानव मुक्तीची व्यापक भूमिका घेऊन लेखन करण्याची गरज आहे. माणूस व कर्मठ समाजही बदलू शकतो या परिवर्तनावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रमाणेच जयवंत भिसे यांचा विश्वास आहे.

# बहुजन समाज पार्टी विधानसभा कार्यकर्ता प्रशिक्षण संपन्न

**सातारा :** कोरेगाव व सातारा विधानसभा कार्यकर्ता प्रशिक्षण शेंद्रे,ता.सातारा येथील विहारात संपन्न झाले.

यावेळी विधानसभाध्यक्ष अंकित वाघमारे (सातारा) व नितीन कांबळे (कोरेगाव), उपासक राजू घोलप, समाधान कांबळे,बौद्धाचार्य मनोज वाघमारे, तेजस वाघमारे,साहिल वाघमारे,वैभव वाघमारे, सनी घोलप,बाळू वाघमारे,उपासिका शीतल वाघमारे, वृषाली वाघमारे, पूनम वाघमारे, छाया वाघमारे, सुषमा वाघमारे, नंदा कांबळे, लता जाधव, इंदुबाई माने, सोनाबाई वाघमारे, शालन वाघमारे आदी कार्येकर्ते, उपासिका-उपासक उपस्थित होते.



**महानवांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना उपासक-उपासिका.(छाया-अनिल वीर)**

# मावळ फेस्टीवलचा उपक्रम कौतुकास्पद ; कृषीमंत्री धनंजय मुंडे



**वडगाव मावळ :** मावळ तालुक्यातील कला, क्रीडा, सांस्कृतिक चा खनिजा असणार्या मावळ फेस्टिवल या उपक्रम कौतुकास्पद आहे.असे गौरवोद्गार राज्याचे कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी शनिवार दि २७ काढले.

वडगाव येथील मावळ फेस्टिवल वतीने ग्रामदैवत श्री पोटोबा महाराज मंदिर प्रांगणात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते यावेळी मावळ फेस्टिवलचे उद्घाटन कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते झाले. यावेळी आमदार सुनील शेळके उपस्थित होते.

यावेळी पोटोबा देवस्थानचे मुख्य विश्वस्त सोपानराव म्हाळसकर, ज तालुका प्रभारी भास्करराव म्हाळसकर, माजी उपसभापती गणेश ढोरे, बाबुराव वायकर,भंडारा डोंगर समितीचे अध्यक्ष साहेबराव काशीद, अमोल बुचडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश खांडगे, भाजपचे निवडणूक प्रमुख रवींद्र भेगडे, माजी सभापती गुलाबराव म्हाळसकर, माजी नगराध्यक्ष मयुर ढोरे, मुख्याधिकारी डॉ.प्रवीण निकम, सुनील ढोरे, विलास काळोखे आदी उपस्थित होते.

आमदार सुनिल शेळके

**इंद्रायणी विक्री केंद्र उभारणीसाठी पाच कोटी**

**मावळ तालुक्यातील प्रसिध्द इंद्रायणी तांदळाची आधारभूत किंमत वाढविण्यासाठी तसेच फुलशेतीसाठी कोल्ड स्टोरेजची सुविधा करण्यासाठी निधी देण्याची मागणी आमदार शेळके यांनी आपल्या भाषणात केली होती. त्या अनुषंगाने सेंद्रिय इंद्रायणी तांदळाचे विक्री केंद्र उभारण्यासाठी पाच कोटी रुपये निधीची घोषणा धनंजय मुंडे यांनी केली. तसेच फुलशेतीसाठी स्मार्ट योजनेतून आवश्यक तो निधी देण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.**

**'करुन गेलो गाव', 'फन फेअर'चे आयोजन**

**फेस्टिवलमध्ये विनोदी कलाकार भाऊ कदम व ओंकार भोजने यांच्या 'करून गेलो गाव' या विनोदी नाटकाचा प्रयोग झाला. तर 'खेळ रंगला पैठणीचा' या स्पर्धात्मक कार्यक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विजेत्या स्पर्धकांना विविध पारितोषिके देण्यात आली. क्रांतीनाना मळेगावकर यांनी सूत्रसंचालन केले. अभिनेत्री मेघा घाडे प्रमुख आकर्षण ठरली. तत्पूर्वी, दुपारी बाळ गोपाळांसाठी फन फेअरचे आयोजन करण्यात आले होते.**

वडगाव मावळ हे कला व क्रीडा संस्कृतीचे केंद्र आहे. राजकीय मतभेद बाजूला ठेवून सर्वांना सामावून घेण्याच्या मावळ फेस्टिवलच्या संयोजकाचे धोरण स्वागतार्ह आहे.''

मंत्री मुंडे व आमदार शेळके यांच्या हस्ते श्रीराम कला पथक (पवळेवाडी) यांना सांस्कृतिक पुरस्कार व एकवीरा जोगेश्वरी दुर्गा परमेश्वरी सामुदायिक विवाह सोहळा समिती (कार्ला) यांना सामाजिक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. बैलगाडा शर्यतीचा राजा-मावळ किंग 'ओम्या' याचा विशेष सत्कार करण्यात आला.

ओम्याचे मालक रामनाथ वारिंगे यांनी पुरस्कार स्वीकारला. मावळ फेस्टिवलच्या डायलिसिस सेंटर या नियोजित प्रकल्पाची घोषणा यावेळी करण्यात आली. फेस्टिव्हलचे अध्यक्ष सुरेश जांभूळकर यांनी स्वागत केले. संस्थापक प्रवीण चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. भूषण मुथा यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रम प्रमुख विनायक भेगडे यांनी आभार मानले.

# वकील संघाच्या हिंगोली जिल्हाध्यक्ष पदाची धुरा ड शिवशंकर शेषराव वाबळे यांच्या खांद्यावर



**हिंगोली :** जिल्हा वकिल संघ हिंगोली यांच्या सन २०२४ च्या अध्यक्ष पदासाठी झालेल्या निवडणुकीत ड शिवशंकर शेषराव वाबळे (उमरेकर) यांची निवड करण्यात आलेली आहे. झालेल्या निवडणुकीत ड शिवशंकर शेषराव वांबळे (उमरेकर) व ड श्रीधर रामकृष्णराव घुगे या दोन उमेदवारांनी आपली उमेदवारी सादर केली होती. खेळी मेळी व सौदार्यपूर्ण वातावरणात निवडणुक पार पाडली. सदर निवडणुकीत निवडणुक अधिकारी म्हणुनड शेषराव पतंगे,ड .एम. एम. मोरे व ड इ.जी. बांगर यांनी निपक्षपणे पुर्ण प्रक्रिया पार पाडली.

दि.२०.०१.२०२४ रोजी झालेल्या मतदानाअंती निवडणुक निर्णय अधिकारी यांनी आपला निकाल जाहिर केला व सदर निवडणुकीत ड. श्रीधर घुगे यांना ९२ मते व ड. शिवशंकर शेषराव वाबळे (उमरेकर) यांना २२४ मते मिळाल्यामुळे ड.शिवशंकर शेषराव वाबळे (उमरेकर) यांची सन २०२४ च्या वकिल संघ हिंगोलीच्या अध्यक्ष पदी बहुमताने निवड झाली. सदर निवडीबद्दल वकिल संघाचे मुख्य मार्गदर्शक तथा महाराष्ट्र व गोवा बार काऊन्सीलचे सदस्य ड सतिषदादा देशमुख, जेष्ठ सदस्य ड. जी. बी. ढाले ड . माणिकराव निळकंठे,ड भास्करराव कावरखे,

ड. पि.के. सिरसाट,

ड.रविंद्र सोनी,

ड.पि.के.पुरी, ड. मतीन पठाण, ड. विष्णुदास भाकरे,ड. प्रभाकर भाकरे, ड. रंभाजी शिंदे, ड. बापुराव बांगर, ड. मनिष साकळे,ड. नारायण मुटकुळे, ड. प्रदिप देशमुख, ड. सुभाष वाघमारे, ड.पि.आर. चव्हाण ड. बि.एस. इंगळे, ड. सुनिल भुक्तर, ड. राजु जोशी, ड. मिलींद गांजरे, ड. महेश आहेर, ड. कैलास कोटकर,

ड. अमोल जाधव, ड. बंटी ऊर्फ अजय देशमुख,ड .नितेश चव्हाण, ड. राजेश आहेर,

ड. शिवप्रसाद पठाडे,

ड. वैजनाथ भाकरे, ड.जि. के. गायकवाड, ड. उल्हास पाटील, ड. रवि जाधव, ड. मुरकुटे, ड. अमित कळासरे, ड .अखिल अहेमद, ड. एस. के. सिरसाट, ड. किरण नर्सीकर, ड.एन.एम. जोशी, ड. उमेश पाटील, ड. हर्ष बनसोडे, ड .सिताराम राठोड,

ड. विलास घोंगडे, ड. अनिल इंगळे,ड .डि.व्ही. कवडे, ड. सुरेश गडदे, ड.एस. पी.गावंडे, ड. संतोष चौतमल, ड. जे.पी.खंदारे, ड. जि.के. जगताप, ड.अभिजय चव्हाण,

ड.के.एम. गिरी.ड. विलास नवघरे, ड.संतोष कुटे, ड. मिलींद कांबळे,ड. सतिष पठाडे,ड.रावण धाबे, ड. जे. एस. पठाण, ड .सय्यद शफिक,ड.पारोकर, ड. सुरज गायकवाड, ड. वानखेडे, ड. महारूद्र जाधव, ड. बद्री टेकाळे, ड. कमलेश परतवार, ड .कल्पेश भाकरे,ड.स्वप्निल इंगळे तसेच महिला वकिल प्रतिनिधी ड. सुनिता देशमुख, ड. सविता देशमुख ड.शारदा भट, ड. नारायणकर, ड. जया करडेकर, ड.शालिनी घाडगे, ड . मनिषा गिरी, ड. सत्वशिला तांगडे,

ड. जयश्री सावरगांवकर, ड.प्रज्ञा कापसे, ड. वैशाली भाले व इतर सर्व वकिल संघातील सन्माननीय सदस्यांनी उपस्थित राहुन नवनिर्वाचित अध्यक्ष श्री. शिवशंकर शेषराव वाबळे (उमेरकर) यांचे अभिनंदन केले.



# ब्राह्मणद्वेष्टे लोक ' आंबेडकरवादी असू शकत नाहीत: श्यामदादा गायकवाड

**ठाणे :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ' बुद्ध आणि त्याचा धम्म ' या ग्रंथाचा आधार असलेले ' बुद्ध चरित ' लिहिणारा अश्र्वघोष कोण होता? राहुल सांकृत्यायन कोण होते? भदंत आनंद कौसल्यायन हे कोण होते? ते सारे ब्राहणच होते, याची आठवण करून देतानाच ब्राम्हण द्वेषाची चळवळ चालवणारे लोक हे सच्चे

' आंबेडकरवादी ' असूच शकत नाहीत, असे प्रतिपादन ज्येष्ठ रिपब्लिकन नेते श्यामदादा गायकवाड यांनी शनिवारी येथे केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अगदी सुरवातीपासून ब्राह्मण्यग्रस्तांना विरोध केलेला आहे, ब्राह्मणांना नव्हे असे त्यांनी अध्यक्षीय भाषणात ठणकावून सांगितले.

ते कल्याण येथील सार्वजनिक वाचनालयाच्या सभागृहात शनिवारी झालेल्या डॉ. माईसाहेब आंबेडकर यांच्या ११२ व्या जयंतीनिम्मित एका परिसंवादात बोलत होते. संविधान समर्थक दलाने

'सूर्यप्रभा माई ' या विषयावर हा परिसंवाद आयोजित केला होता. त्यात प्रख्यात कवी अरुण म्हात्रे, कादंबरीकार प्रा. अविनाश कोल्हे, प्रा.डॉ. विठ्ठल शिंदे, प्राचार्य डॉ. मिलिंद तायडे, प्रभाकर ओव्हाळ हे विचारवंत वक्ते होते.

आपला देश भविष्यात एकाधिकारशाहीकडे वाटचाल करेल, असा इशारा माईंनी १९८० सालातच दिला होता. हे द्रष्टेपण आणि नेतृत्वाची पूर्ण क्षमता त्यांच्यात होती, असे सांगून श्यामदादा म्हणाले की,बाबासाहेबांच्या पश्चात १९५६ करण्यात आलेली बदनामी ही त्यांना बौद्ध समाजाच्या नेतृत्वाच्या स्पर्धेतून बाद करण्यासाठी तत्कालीन रिपब्लिकन नेत्यांनी केलेले भयंकर षडयंत्र होते.

# निवडणुकीपुरते राजकारण करणाऱ्यान पासून सावध राहा : आ. बाळासाहेब पाटील

**नागठाणे :** राज्याचे माजी सहकार व पणन मंत्री आमदार बाळासाहेब पाटील यांच्या विशेष प्रयत्नातून जिल्हा वार्षिक योजना सन २०२३-२४ मधून साकव योजनेअंतर्गत कन्हेर उजवा कालव्याच्या कॅनॉलवर नांदगांव ता.सातारा गावच्या हद्दीतील मायनर क्र.४४ वर साकव पूल बांधण्यासाठी रक्कम रुपये ५३.८४ लक्ष मंजूर झाले असून, त्या साकव पुलाचे भूमिपूजन आमदार बाळासाहेब पाटील यांच्या शुभहस्ते आज संपन्न झाले.

यावेळी बोलताना ते म्हणाले की शासनाचा प्रतिनिधी हा तेथील स्थानिक आमदार असतो आमदार सुचविल त्या कामास प्राधान्य असते त्यामुळे निवडणूक पुरते कोणी काही बोलत असते त्यामुळे



निवडणुकी पुरते राजकारण करणारा पासून सावध राहावे तसेच या भागातील कार्यकर्ता हा जिद्दीचा आणि चिकाटीचा आहे त्यामुळे कोणत्याही आमिषाला बळी पडणार नाही याची मला खात्री आहे.

तसेच या साकव पलामुळे फत्यापूर, लिंबाचीवाडी, टिटवेवाडी, खोजेवाडी, देशमुखनगर, नांदगाव या गावातील शेतकरी बांधवांचा अनेक वर्षांचा प्रलंबित प्रश्न मार्गी लागणार आहे, या पुलावरून शेती माल ने आन करण्यासाठी परिसरातील शेतकऱ्यांना सोयीची ठरणार आहे.तसेच महाविकास आघाडी सरकारने मंजूर केलेल्या कामांना महायुती सरकारने स्थगिती दिली होती, या स्थगिती आदेशाच्या विरोधात आम्ही न्यायालयात याचिका दाखल केली, सदरची न्यायालयीन लढाई जिंकून, कराड उत्तर मतदार संघातील विविध विकास कामांवरील स्थगिती आदेश उठवण्यास राज्य सरकारला भाग पाडले, स्थगिती उठलेली सर्व कामे सुरू झाली त्यामुळे आज या साकव पुलाचे भूमिपूजन करण्यात आले.

याप्रसंगी अजिंक्यतारा सहकारी साखर कारखान्याचे संचालक रामचंद्र जगदाळे, विजय घोरपडे, माजी संचालक चंद्रकांत घोरपडे, मनोहर घाडगे, सह्याद्रि सहकारी साखर कारखान्याचे संचालक संजय कुंभार, सातारा तालुका खरेदी विक्री संघाचे चेअरमन सुनील काटे, प्रकाश घोरपडे, विजय घोरपडे, सुरेश माने, मनोहर घाडगे, टिटवेवाडीच्या सरपंच सौ शीला सावंत, रामदास कणसे, सतीश मोरे, डॉ.सावंत, हणमंत घाडगे, गजानन देशमुख, अशोक पिसाळ, प्रताप पाटील, पांडुरंग देशमुख, प्रभाकर घाडगे, दयानंद घाडगे, मधुकर घाडगे, शंकर माने, संपत देशमुख, भरत पानस्कर, तुषार घाडगे, सुरज घाडगे, शिवाजी कोकाटे, गणपत घाडगे, हिंदुराव मामा, अक्षय जाधव, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सहाय्यक अभियंता स्वप्नील ढवन, तसेच नांदगाव, फत्यापूर, टिटवेवाडी, देशमुखनगर, लिंबाचीवाडी आदी गावातील शेतकरी उपस्थित होते.

# कोयना धरण परिसरात सौम्य भूकंपाचा धक्का




**सातारा/शिराळा :** कोयना धरण परिसरात रविवारी सायंकाळी ५ वाजून ६ मिनिटांनी सौम्य भूकंपाचा धक्का जाणवला. हा धक्का ३.१ रिक्टर स्केलचा होता आणि धरणाला कोणताही धोका नसल्याचे धरण व्यवस्थापनाने सांगितले आहे.

या भूकंपाचा केंद्रबिंदू कोयना धरणापासून १६ किलोमीटर अंतरावर म्हणजे, पाटण तालुक्यातील हेळगावच्या नैर्ऋत्येला सहा किलोमीटर अंतरावर, जमिनीपासून ९ किलोमीटर खोल आहे. चांदोली (ता. शिराळा, जि. सांगली) धरण परिसरातही रविवारी सायंकाळी ५ वाजून ६ मिनिटांनी सौम्य भूकंपाचा धक्का जाणवला.

# बालगृहातील प्रवेशितांचा आजपासून जिल्हास्तरीय चाचा नेहरू बालमहोत्सव

**सातारा :** महिला व बाल विकास विभागामार्फत राज्यात बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ अन्वये बालगृहे कार्यरत असून या बालगृहात अनाथ, निराधार, उन्मार्गी, विधी संघर्षग्ररूस्त मुले/मुली दाखल आहेत. दाखल प्रवेशितांच्या अंगी असलेल्या विविध कलागुणांना वाव मिळण्याच्या दृष्टीने सातारा जिल्ह्यातील बालगृहात दाखल असलेल्या व इतर विद्यालयातील एकुण २०० प्रवेशितांच्या जिल्हास्तरावरील चाचा नेहरू बालमहोत्सवा अंतर्गतच्या क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले आहे. हा बालमहोत्सव दि.३० जानेवारी ते १ फेबुवारी या कालावधीत पोलीस कवायत मैदान,सातारा येथे संपन्न होणार असून जिल्हास्तरावरील चाचा नेहरू बालमहोत्सवाचे उद्घाटन राज्य उत्पादन शुल्क मंत्री तथा पालकमंत्री सातारा

शंभूराज देसाई यांच्याहस्ते दि. ३० जानेवारी रोजी सकाळी १०.०० वाजता करण्यात येणार आहे.

या क्रीडा स्पर्धांमध्ये खो-खो, कबड्डी, क्रिकेट, १०० मिटर धावणे, २०० मिटर धावणे, ४०० मिटर धावणे, रिले, गोळाफेक, थाळी फेक, लिंबू चमचा, संगित खुर्ची, उंच उडी, लांब उडी, इत्यादी क्रिडा स्पर्धा आयोजित केल्या आहेत. बौध्दिक स्पर्धांमध्ये बुध्दीबळ, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा तसेच सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये वैयक्तिक नृत्य, समूह नृत्य, समूह गीते या स्पर्धा होणार आहेत. चाचा नेहरू बाल महोत्सवामध्ये विजेता ठरलेल्या विजयी व उपविजयी संघाना शिल्ड, ट्रॉफी, स्पर्धकांना प्रमाणपत्र व मेडल देवून मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी बालकांना प्रशस्तिपत्र देवून गौरविण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास शंभूराज शिवाजीराव देसाई, मंत्री, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री,ठाणे व सातारा जिल्हा तसेच मा.जिल्हाधिकारी, सातारा पोलीस अधिक्षक, सातारा, अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा व इतर मान्यवर उपस्थित राहून मुलां-मुलींना योग्य मार्गदर्शन करणार आहेत. दि. १ फेबुवारी रोजी बक्षीस वितरणाच्या कार्यक्रमाने या बालमहोत्सवाचा समारोप होणार आहे. अशी माहिती कार्यक्रमाचे आयोजक जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी विजय तावरे यांनी दिली.

# आम्हाला ओबीसींना संरक्षण देता आलं नाही तर फडणवीसांनी मांडली रोखठोक भूमिका

ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागू नये यासाठी ओबीसी नेते आणि राज्यातील सत्ताधारी अजित पवार गटातील मंत्री छगन भुजबळ यांनी आपल्याच सरकारविरोधात आवाज उठवला आहे.

महाराष्ट्रात गेल्या काही महिन्यांमध्ये मराठा आरक्षणाचा मुद्दा खूप तापला होता. अखेर २७ जानेवारी रोजी राज्य सरकारने मराठा आरक्षणासंदर्भात अध्यादेश काढला आणि स्वतः मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा आंदोलनाचं नेतृत्व करणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांच्या हाती सोपवला. राज्य सरकारने मराठा आंदोलकांच्या विविधं मागण्या मान्य केल्या आहेत. यानंतर ओबीसी समाजाकडून तीव्र विरोध सुरू झाला आहे. ओबीसी नेते आणि राज्यातील सत्ताधारी अजित पवार गटातील मंत्री छगन भुजबळ यांनी आपल्याच सरकारविरोधात आवाज उठवला आहे. तसेच मुख्यमंत्र्यांचा निर्णय आपल्याला मान्य नसल्याची भूमिका त्यांनी जाहीर केली आहे. यावर महायुतीतल्या महत्त्वाच्या नेत्यांकडून प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत.

छगन भुजबळ म्हणाले, मी ओबीसींबाबत माझी भूमिका मांडत राहीन, मला सोबत घ्यायचं की नाही ते पक्षानं आणि महायुतीने ठरवावं. वेळ पडल्यास माझी पक्षातून बाहेर पडण्याची तयारी आहे. परंतु, मी माझा लढा चालू ठेवेन. यावर राज्याचे उपमुख्यमंत्री



आणि भाजपा नेते देवेंद्र फडणवीस यांनी भाजपाची भूमिका मांडली आहे. फडणवीस म्हणाले, आमचं सरकार कुठल्याही परिस्थितीत ओबीसींवर अन्याय होऊ देणार नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचीदेखील तीच भूमिका आहे. आम्हाला ओबीसीचं आणि त्यांच्या हक्कांचं संरक्षण करावंच लागेल. मुख्यमंत्र्यांचंही तेच म्हणणं आहे.

उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, मी राज्याला स्पष्टपणे सांगतो की, भारतीय जनता पार्टी या सरकारमध्ये आहे तोवर काहीही झालं तरी आम्ही ओबीसींवर अन्याय होऊ देणार नाही. उद्या अशी वेळ आली की, आम्हाला ओबीसींना संरक्षण देता येत नाहीये. तर, मी स्वतः माझ्या वरिष्ठांशी बोलेन. काहीही झालं तरी ओबीसींवर अन्याय होणार नाही याची काळजी घेतली जाईल आणि हीच भाजपाची भूमिका आहे.

छगन भुजबळांच्या राज्य सरकारवरील नाराजीबाबत विचारल्यावर फडणवीस म्हणाले, माझं त्यांना एवढंच सांगणं आहे की, त्यांनी संयम ठेवावा.

मी लवकरच त्यांच्याशी चर्चा करणार आहे. राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयावर त्यांचे जे काही आक्षेप असतील ते त्यांनी सांगावे. कुठेही ओबीसींवर अन्याय होत असेल तर आपण त्यात परिवर्तन करू. आवश्यकता असेल तिथे सुधारणा करू. परंतु, ओबीसींवर अन्याय होऊ देणार आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या याचिकेवर उद्या आणि परवा अंतिम सुनावणी

## राहुल नार्वेकरांची माहिती

**मुंबई :** विधानसभा अध्यक्षराहुल नार्वेकरयांनी शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणाचा निकाल दिल्यानंतर, आताराष्ट्रवादी काँग्रेसप्रकरणात काय निर्णय देणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, सुप्रीम कोर्टाने या प्रकरणाचा निकाल १५ फेब्रुवारीपर्यंत द्या, असे निर्देश सुप्रीम कोर्टाने राहुल नार्वेकरांनादिले आहेत. याबाबत नार्वेकरांनी आज महत्वाची माहिती दिली.

माध्यमांशी संवाद साधताना नार्वेकर म्हणाले की, 'राष्ट्रवादी काँग्रेसपक्षाच्या याचिकेसंदर्भात आजची सुनावणी पूर्ण झाली असून, आम्ही आजच आम्ही दोन्ही बाजुचा एव्हिडेन्स क्लोज केलेला आहे. उद्या आणि परवा यावर अंतिम सुनावणी होईल आणि ३१ तारखेला हे प्रकरण क्लोज होईल. मला खात्री आहे १५ फेब्रुवारीच्या आत अंतिम निर्णय जारी केला जाईल,' अशी माहिती त्यांनी यावेळी दिली.

देशाच्या पक्षांतर बंदी कायदा समितीच्या अध्यक्षपदी राहुल



नार्वेकरांची नेमणूक करण्यात आली आहे, त्यावरुन विरोधक सत्ताधारी भाजपावर निशाणा साधत आहेत. दरम्यान, नार्वे करांची निवड हे देशातील लोकशाही संपवण्याच्या दिशेने टाकलेले पुढचे पाऊल मानायचे का? असा सवाल माजी मुख्यमंत्रीउद्धव ठाकरेयांनी विचारला आहे.लोकशाही संपवण्याच्या दिशेने टाकलेले पुढचे पाऊल मानायचे का?; उद्धव ठाकरेंचा सवालयाबाबत बोलताना नार्वेकर म्हणाले की, अशा मोठ्या पदावर राज्यातील एखादा व्यक्तीची निवड झाल्यावर, राज्यासाठी हा मोठा क्षण असतो. पण, उद्धव ठाकरेंचा राज्याची अस्मिता आणि राज्यातील बांधवाबद्दल प्रेम व्यक्त करण्याचा वेगळा अंदाज असेल. त्यामुळे मी त्यांच्या शुभेच्छांसाठी त्यांना धन्यवाद करतो. त्यांचे माझ्यावर विशेष प्रेम आहे,' असा टोला नार्वेकरांनी लगावला.



# गळफास लावून आत्महत्या

**पाचगणी :** दांडेघर ता महाबळेश्वर येथील आर्यन विजय चव्हाण वय-१७ रा याने सकाळी

९.00 वा. च्या दरम्यान दांडेघर एसटी बस स्टॉप च्या पुढे बॅनर लोखंडी फ्रेमला गळफास लावून आत्महत्या केली.आत्महत्याचे नेमके कारण समजले नाही.

याबाबतची फिर्याद विराज विवेक चव्हाण रा. दांडेघर यांनी पाचगणी पोलीस ठाण्याला दिली.या फिर्यादीवरून पाचगणी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाला असून अधिकचा तपास सपोनि राजेश माने यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# तर शेतमालाला रास्त भाव मिळेल, शेतीला उद्योग म्हणून पाहायला हवे : धनंजय मुंडे

शेतकऱ्यांनी शेती विषयक विचार बदलले पाहिजेत, शेतीला एक उद्योग म्हणून पाहिले पाहिजे. त्यादृष्टीने शेती केली पाहिजे तरच शेती व शेतकऱ्यांचे प्रश्न सुटू शकतील, असे प्रतिपादन कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी केले. शेतकरी कंपनीचा शेतमाल आता अमेझॉन , फ्लिपकार्ट, हिंदुस्तान युनीलिव्हर, टाटा यांसारख्या मोठ्या बाजारपेठेत थेट जाणार असल्याचे सांगितले जात आहे.

महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉर्मेशन , कृषी विभाग, मा.बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प आणि ग्राम सामाजिक परिवर्तन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कृषी मूल्य साखळी भागीदारी बैठक -२०२४ सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित केली होती. त्यावेळी ते बोलत होते.

**शेतकऱ्यांच्या शेतीमालाला रास्त भाव मिळेल**



स्मार्ट प्रकल्प अंतर्गत सहभागी शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या कृषी उत्पादनास बाजारपेठ मिळवून देण्यासाठी आंतरराष्ट्रीय व देशातील महत्त्वपूर्ण कंपन्यां सोबत करार करण्यात येत आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या शेतीमालाला रास्त भाव मिळेल. कृषी विभागामार्फत कृषी उत्पादनांची मूल्य साखळी निर्माण करण्यासाठी कंपनी व शेतकरी उत्पादक कंपन्यांना सर्व मदत देण्यात येईल. प्रधानमंत्री यांनी देशाची अर्थव्यवस्था पाच ट्रिलियन करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यामध्ये महाराष्ट्राचा हिस्सा एक ट्रिलियन राहणार आहे. कृषी आणि संलग्न क्षेत्राचा वाटा सात टक्के आहे, तो आता सोळा टक्के करण्याचा प्रयत्न करण्यात येईल, असे धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे.

**कृषी मूल्य साखळी भागीदारी बैठक उपयुक्त ठरणार**

कॉर्पोरेट खरेदीदार आणि किरकोळ विक्रेत्यांशी थेट संबंध प्रस्थापित करण्याकरिता शेतकरी उत्पादक कंपन्यांसाठी मार्ग तयार करणे, बाजाराच्या गरजा, गुणवत्ता मानके आणि खरेदी प्रक्रियांवर चर्चा करण्यास प्रोत्साहित करण्यासाठी कृषी मूल्य साखळी भागीदारी बैठक उपयुक्त ठरणार आहे, असा विश्वास धनंजय मुंडे यांनी व्यक्त केला. या बैठकीला सुमारे सोळा शेतकरी उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी आणि आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय कंपन्यांचे प्रतिनिधी यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आले.

दरम्यान, बैठकीला कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव अनुप कुमार,महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉर्मेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविण परदेशी यांच्यासह फ्लिपकार्टचे रजनीश कुमार, अमरेंद्र मिश्रा, अतुल जैन मनदीपसिंग टुली अमेझॉनचे विवेक धवन तसेच विविध आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पातळीवरील कंपन्यांचे प्रतिनिधी आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# उत्तरेकडच्या पाऊस, बर्फवृष्टीने वाढेल महाराष्ट्राची थंडी; विदर्भ गारठणार

**नागपूर :** लागोपाठ येणाऱ्या तीन पश्चिमी झंजावाताच्या साखळीतून संपूर्ण उत्तर भारतात सध्या असलेल्या धुके व बर्फवृष्टीबरोबरच पावसाची शक्यताही निर्माण झाली. या प्रभावाने विदर्भासह महाराष्ट्रात ४ फेब्रुवारीपर्यंतथंडी वाढण्याची शक्यता आहे. विदर्भातही दिवसरात्रीचे तापमान सरासरीत किंवा खाली राहण्याचा अंदाज आहे.२५ जानेवारीला ८.७ अंशावर गेल्यानंतर तापमान पुन्हा वाढायला लागले. थंड हवेची दिशा बदलल्याने पारा वाढत आहे. नागपुरात सोमवारी किमान तापमानात १.२ अंशाची वाढ होत १२.८ अंशावर पोहचले.



दिवसाचे तापमानही अंशत: वाढत ३०.४ अंशावर गेले आहे. गोंदिया वगळता संपूर्ण विदर्भात कमाल तापमान ३० अंशाच्या वर आहे. येथे रात्रीचा पारा सर्वात कमी ११.६ अंश नोंदविण्यात आला आहे. विदर्भात मात्र पहाटेचे किमान तापमान हे १२ अंश म्हणजे सरासरी इतके, तर दुपारचे कमाल तापमान २८ ते ३० अंश सरासरी इतकेचे राहण्याचा अंदाज आहे.

# सोलापुरात तुरीला उच्चांकी १० हजार ५०० रुपयांचा दर; ४०० क्विंटल आवक

**सोलापूर :** सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत मागील पंधरा दिवसांपासून तुरीच्या दरात वाढ होत आहे. सोमवारी उच्चांकी हजार पाचशे रुपयांचा दर मिळाला आहे. मागील दहा दिवसांपूर्वी १० हजार दोनशे रुपयांचा दर मिळाला होता.

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती कांद्याप्रमाणे तुरीचीही आवक वाढत आहे. मागील काही महिन्यांपूर्वी तुरीचा दर आठ हजारांपर्यंत खाली गेला होता. मात्र, यंदा परतीच्या पावसामुळे तुरीला अळ्या लागल्यामुळे उत्पादनात घट झाली आहे. त्यामुळे यंदा तुरीची दर वाढण्याची शक्यता व्यापाऱ्यांनी वर्तविली होती. त्यानुसार मागील महिनाभरापासून तुरीची आवक वाढलेली आहे. सोमवारी जवळपास ४० गाड्यांची आवक होती. तूरडाळीची मागणी वाढल्यामुळे तुरीच्या दारात वाढ होत आहे.

पावसामुळे माल खराब झालेला आहे. त्यामुळे एकरी उतारा कमी निघत आहे; मात्र सध्या मालाला चांगला दर मिळत असल्याने शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त होत आहे. सोमवारी झालेल्या लिलावात



जवळपास ४०० क्विंटल मालाची आवक होती. त्यात ८६०० ते १०५०० रुपयांपर्यंत दर मिळालेला आहे.

सरासरी दर दहा हजारांच्या आसपास असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले. अक्कलकोट तालुक्यातील पानमंगरूळ येथील शेतकरी रामचंद्र पोतदार यांच्या पाच पिशव्यांना सर्वाधिक १०,५०० रुपयांचा दर मिळाला आहे. हुडे यांच्याकडून एस.एस. ग्रोचे श्रीशैल अंबारे यांनी सर्वाधिक दराने माल खरेदी केली आहे.

# आनंद हॉस्पिटलने सामाजिक बांधिलकी जपली : डॉ पगारिया



**भोसरी :** सुदृढ व निरोगी बलशाली भारताच्या प्रगतीसाठी आरोग्य- संपन्न नागरिक हीच खरी संपत्ती आहे .छोट्या मोठ्या आजारां चे निदान त्वरित करून त्यावर आवश्यक आधुनिक उपचार मिळाले पाहिजेत, यासाठी आशा आरोग्य शिबिरांचे आयोजन सामाजिक जबाबदारी समजून केले पाहिजे असे मत ज्येष्ठ शिक्षण तज्ञ व समाजसेवी डॉ अशोक कुमार पगारिया यांनी आनंद मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल आणि रोटरी क्लब ऑफ डायनामिक भोसरी यांच्या संयुक्त विद्यमाने आनंद मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल भोसरी येथे प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने आयोजित मोफत रोग निदान व उपचार शिबिर आपले मत व्यक्त केले यावेळी जेष्ठ फिजिशियन डॉ अनिल खाडे आणि रोटरी क्लब ऑफ अध्यक्ष उद्योजक ज्ञानेश्वर विधाते मधुमेह तज्ञ डॉ कृष्णा दळवी, अस्थिरोग तज्ञ डॉ प्रशांत पवार, स्त्रीरोग तज्ञ डॉ योगेश गाडेकर ,सामाजिक कार्यकर्ते कुंडलिक लांडगे, राहुल लांडगे ,उद्योजक संजय उदावंत, उत्सव होम असोसिएशनचे अध्यक्ष अप्पासाहेब काळजे, आनंद हॉस्पिटलचे डायरेक्टर डॉ संतोष मोरे ,डॉ पांडुरंग लांडगे, सचिव दीपक सोनवणे ,अण्णासाहेब मटाले , दत्ता कोल्हे निवृत्ती लांडगे विनायक बागडे आदी मान्यवर उपस्थित होते.

आनंद हॉस्पिटलचे संचालक डॉक्टर संतोष मोरे यांचा वैद्यकीय सेवेतील विशेष योगदानाबद्दल हेल्थ आयकॉन पुरस्काराने महाराष्ट्र राज्याचे वैद्यकीय मंत्री डॉक्टर तानाजी सावंत यांच्या हस्ते गौरव करण्यात आला संस्थेच्या वैद्यकीय सेवेला मिळालेली कौतुकाची थाप परिवाराचा सन्मान आहे त्यामुळे आनंद हॉस्पिटल परिवाराच्या वतीने डॉ मोरे यांचा डॉ पगारिया यांच्या हस्ते शाल श्रीफळ देऊन गौरव करण्यात आला.

शिबिरामध्ये मधुमेह , हृदयरोग ,रक्तदाब आणि इतर फुफुसांच्या आजारावर , हाडांचे सर्व विकार आणि मणक्याचे सर्व विकार अशा आजारांवर तपासणी व उपचार करण्यात आले, या शिबिरामध्ये हाडांची ठिसूळता म्हणजेच बीएमडी तपासणी , शुगर तपासणी मोफत करून देण्यात आली, या शिबिराचा लाभ ३७५ नागरिकांनी घेतला , कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपक सोनवणे , आभार प्रदर्शन डॉ संतोष मोरे यांनी केले,

कार्यक्रम यशस्वी, करण्यासाठी डॉ विद्या फल्ले , डॉ ऋतुजा उचाळे यांनी परिश्रम घेतले,



## तीव्र निषेध

महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांबद्दल अवमानकारक वक्तव्य करणाऱ्या सुधींद्र कुलकर्णीचा तीव्र निषेध आज रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया( आठवले) पक्षाने आझाद मैदानात निदर्शने करून केला.यावेळी रिपाइं चे राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश महातेकर; मुंबई अध्यक्ष सिद्धार्थ कासारे; सरचिटणीस विवेक पवार; जिल्हा अध्यक्ष संजय पवार; रमेश गायकवाड; प्रकाश जाधव; सोना कांबळे; शिरीष चिखलकर ऍड. अभया सोनवणे; आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.



## महामहिम मा.मंगुभाई पटेल यांची सदिच्छा भेट

मध्य प्रदेशचे राज्यपाल महामहिम मा.मंगुभाई पटेल यांची आज भोपाळ येथील राजभवन मध्ये रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी सदिच्छा भेट घेतली.यावेळी रिपाइं चे मध्य प्रदेश चे प्रभारी मोहम्मद एहसान; रिपाइं चे मध्य प्रदेश अध्यक्ष राजेश खडसे; रिपाइंचे प्रसिद्धिप्रमुख हेमंत रणपिसे उपस्थित होते.

# सिग्नेट पब्लिक स्कूल न्यू आणि ज्युनिअर कॉलेज न्यू नऱ्हेच्या विद्यार्थ्यांनी रचला विश्व विक्रम

## आंतरराष्ट्रीय शाळा पुरस्कृत

यांचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा नुकताच उत्साहात पार पडला. 'राजेशाही' हा विषय घेऊन दोन हजार पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी 'वंडर बुक ऑफ रेकॉर्ड्स इंटरनॅशनल' आणि 'वर्ल्ड रेकॉर्ड इंडिया' यात जागतिक विक्रम घडवला. जे एस पी एम आणि टी एस एस एम चे संचालक मा. प्रो. डॉ. तानाजी सावंत (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री, महाराष्ट्र राज्य.) सर या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. नऱ्हे कॅम्पसचे विश्वस्त 'मा. ऋषीराज सावंत' सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. शाळेच्या प्राचार्या. डॉ.अजिता परबत यांनी शाळेची प्रगती तसेच शाळेतील विद्यार्थ्यांनी मिळविलेले विशेष प्राविण्य याची माहिती दिली व वार्षिक अहवाल सादर केला. सध्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी अधिकाधिक अभ्यास करून शाळेचे नाव अधिक उज्ज्वल करावे, असे जे. एस. पी. एम च्या शालेय कार्यक्रम संचालिका 'डॉ.अमिता कामत' यांनी सांगितले.

'राजेशाही' या विषयांमध्ये एकाच विषयावर कला, नृत्य, नाटक , यावर विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या पद्धतीने परफॉर्मन्स सादर केले व जागतिक विक्रम पार केला. सतयुगापासून ते कलियुगापर्यंत विद्यार्थ्यांनी मनोरंजक पद्धतीने दिमाखदार सोहळा केला. तसेच या शाळेमध्ये इयत्ता दहावी पर्यंत शिकून गेलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

नीता दोंडे आणि अनिरुद्ध हलांडे हे वंडर बुक ऑफ रेकॉर्ड्स इंटरनॅशनल व दिनेश पैठणकर वर्ल्ड रेकॉर्ड इंडिया यांच्यातर्फे परीक्षक म्हणून उपस्थित होते. सिग्नेट पब्लिक स्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलनास शाळेचे दोन हजार पेक्षा जास्त विद्यार्थी, शिक्षक, पालक, उपस्थित होते. नृत्य, नाटक इत्यादी. सांस्कृतिक कार्यक्रम सादर झाले.

या सांस्कृतिक कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनाची धुरा शालेय विद्यार्थ्यांनी सांभाळली. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालयाच्या शिक्षिका मेघा दीपक होमकर व सुषमा जाधव यांनी केले. या सोहळ्यात जेएसपीएम आणि टी एस एस एम चे डिरेक्टर व जेएसपीएम युनिव्हर्सिटीचे प्रेसिडेंट डॉ. रवी जोशी सर, प्रोफेसर डॉ. एस आर थिटे सर सहाय्यक संचालिका डॉक्टर




अमिता कामत, सर्व कॅम्पसचे प्राचार्य उपस्थित होते. तसेच हा जागतिक विक्रम पार करण्यासाठी संतोष राऊत सर यांचे मार्गदर्शन लाभले.

सिग्नेट पब्लिक स्कूलच्या प्राचार्य डॉ.अजिता परबत,उपप्रचार्य. प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सीमा यादव, तसेच समन्वयक शिक्षिका व सर्व शिक्षकांच्या सहभागाने कार्यक्रम यशस्वी पार पडला. कार्यक्रमाची सांगता 'वंदे मातरम' ने झाली. व कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शाळेचे उपप्राचार्य डॉक्टर हितेश शर्मा यांनी केले.

# साताऱ्यात पाण्याविना भारतातील पहिली पोलीस चौकी : आदित्य गायकवाड

**सातारा :** गतिमान सरकार व मोदी सरकार म्हणून जाहिरात बाजी करणाऱ्या आपल्या देशामध्ये अनेक घटनेची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये होते. तशीच नोंद आता भारतातील पाण्याविना साताऱ्यात एक पोलीस चौकी आहे. सातारा शहर पोलीस ठाणे अंतर्गत सातारा जिल्हाधिकारी कार्यालय, सदर बाजार, सातारा या ठिकाणी ही पोलीस चौकी असून त्याची नोंद व्हावी. यासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई गट) सातारा जिल्हा युवक जिल्हाध्यक्ष आदित्य गायकवाड प्रयत्न करणार असल्याची माहिती त्यांनी दिली आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी व महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे प्राथमिक शिक्षण झालेल्या या सातारा भूमी आहे . याच ठिकाणी सातारा जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वारा नजीक ही पोलीस चौकी असून उद्घाघटना पासून आतापर्यंत त्याठिकाणी पाण्याची जोडणी मिळाली नाही.या ठिकाणी बंदोबस्तासाठी पोलीस कर्मचाऱ्यांना पाण्याविना कर्तव्य बजवावे लागत आहे. सातारा पंचायत समितीच्या आवारातील नळाद्वारे पाण्याची तहान भागवावी लागत आहे.

सातारा शहर पोलीस ठाणे अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय सातारा या ठिकाणी सातारा जिल्ह्यातील अनेक आंदोलन होतात. मोर्चे निघतात. उपोषण केले जाते .या वेळेला पोलीस बंदोबस्त आवश्यक असल्यामुळे ऊन- वारा -पावसाची तमा न बाळगता अनेक पोलीस कर्मचारी कर्तव्य बजावत असतात. त्यातूनच मग या ठिकाणी पोलीस चौकी उभी करावी. अशी मागणी पुढे आलेली होती .त्या अनुषंगाने सातारचे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी व पोलीस अधीक्षक समीर शेख आणि सार्वजनिक बांधकाम मंडळाचे अध्यक्ष अभियंता संतोष रोकडे यांच्या अथक प्रयत्नातून या ठिकाणी पोलीस चौकी बांधण्यात आली. त्याचे विलंबाने का होईना अधिकृत रित्या उद्घाघाटन दि २१ सप्टेंबर २०२३ रोजी राज्य उत्पादन शुल्क मंत्री व सातारा- ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री श्री शंभूराजे देसाई यांच्या हस्ते झाले. या वेळेला अनेक मान्यवर उपस्थित होते.

या गोष्टीला आता चार महिने पूर्ण होऊन सुद्धा अद्यापही पाण्याची जोडणी न केल्यामुळे या पाण्याविना पोलीस चौकीला भेट देणाऱ्यांना पाणी देता का पाणी ? असे म्हणण्याची वेळ आलेली आहे. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा केला असता सदरचे पाण्याचे देयक कोणी द्यावे ? हा कळीचा मुद्दा असल्यामुळे तसेच सातारा शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांनी पत्र पाठवून मागणी करावी. असे सांगण्यात आले. परंतु वरिष्ठांच्या परवानगीशिवाय कोणतेही पत्र देता येत नाही. त्यामुळे या ठिकाणी पाणीपुरवठा करणारी जोडणी होऊ शकलेली नाही. गतिमान सरकार किती गतीने नकारात्मक विचार करीत आहेत. याची चुणूक दाखवली गेली आहे. अशी टीका होताना दिसून येत आहे.

सध्या महाराष्ट्रात गतिमान सरकार, मोदी सरकार अशी जाहिरात बाजी करून लोकांची दिशाभूल केली जाते. प्रत्यक्षात मात्र कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी ज्या विभागाकडे आहे. त्या विभागाला जर पाणी मागण्यासाठी दाद मागावी लागत असेल तर कायदा व सुव्यवस्था कशी राखली जाईल ? हा प्रश्न उपस्थित केला जात आहे .

# आपण निर्धार केल्यास कोणीही राज्यघटना बदलू शकत नाही

## ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांचे प्रबोधन शिबिरात प्रतिपादन

**शिरोळ :** धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाचा, एकत्रित लढा देण्याचा इतिहास हा खरा स्वातंत्र्याचा इतिहास आहे. राज्यघटना समजावून घेऊन ती टिकवून ठेवणे व त्याची अंमलबजावणी करणे हे पुढील पिढीची जबाबदारी आहे. स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास आणि मूल्ये ही राज्यघटना निर्मिती करीत असताना लाभलेली आहेत. उदारमतवादी लोकशाही, सामाजिक न्यायाचा विचार आणि धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाचा विचार हा राजघटनेतून करण्यात आला आहे. अनेक देशात राज्यघटना बदलल्या पण भारतात नाही. त्यामुळे आम्ही निर्धार केला तर कोणीही राज्यघटना बदलू शकत नाही, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत व समाजवादी प्रबोधिनीचे अध्यक्ष डॉ. अशोक चौसाळकर यांनी केले.

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाची सांगता आणि भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षारंभानिमित्त डॉ. आप्पासाहेब उर्फ सा. रे. पाटील सोशल फाउंडेशन आणि समाजवादी प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्रबोधन शिबिरामध्ये 'भारतीय स्वातंत्र्यलढा व राज्यघटना' याविषयावर ते बोलत होते. शिबिराच्या अध्यक्षस्थानी साप्ताहिक साधनाचे संपादक विनोद शिरसाठ होते.



**शिरोळ येथे दत्त साखर कारखाना कार्यस्थळावर मार्गदर्शन करताना ज्येष्ठ साहित्यिक अशोक चौसाळकर.**

प्रारंभी कालवश सा. रे. पाटील यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला व दीपप्रज्वलन करण्यातआले. या शिबिराचे स्वागताध्यक्ष उद्यानपंडित गणपतराव पाटील यांनी सर्वांचे स्वागत केले. समाजवादी प्रबोधिनीचे सरचिटणीस प्रसाद कुलकर्णी यांनी शिबिराच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली.

१८५७ ते १९४७ या काळातील स्वातंत्र्य लढ्यातील विविध टप्पे, विविध सूत्रे, वैशिष्ट्ये आणि चळवळ यांचा आढावा घेऊन डॉ. अशोक चौसाळकर म्हणाले, महात्मा गांधीजींचे जीवन एक महाकाव्य असून ते त्याचे महानायक आहेत. त्यांनी लोकांची असामान्य चळवळ उभी करून देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. याचा आदर्श तिसऱ्या जगातील अनेक देशांनी घेऊन तेही स्वतंत्र झाले.

भारतीय स्वातंत्र्यलढा ही जगातील अनेक देशांच्या स्वातंत्र्यलढ्याची गुरुकिल्ली आहे. भारत आणि पाकिस्तानच्या फाळणीला महात्मा गांधी व नेहरू हे जबाबदार नसून ब्रिटिश साम्राज्यवाद्यांनी फाळणी केली आहे. फाळणी वेळी ब्रिटिशांनी प्रशासन कार्यक्षम न केल्यानेच मोठ्या प्रमाणात हत्याकांड घडले होते असे सांगून त्यांनी दिडशे वर्षांचा स्वातंत्र्यलढा व राज्यघटना याबाबत सुसूत्र व अभ्यासपूर्ण मांडणी केली. दुसऱ्या सत्रात 'स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व संविधान' या विषयावर बोलताना सोलापूरचे अप्पर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे म्हणाले, नोकरशाही मधील नोकर ज्यावेळी आपल्याला आपल्या समाजाचा, आपल्या जातीचा आहे असे वाटतो, त्यावेळी लोकशाहीचा पराभव झाला असे म्हणावे लागेल. त्यामुळे नोकरशाहीवर संविधान जपण्याची मोठी जबाबदारी आली आहे. अधिकाऱ्यांचे चरित्र, सामाजिक बांधिलकी, कार्यक्षमता न पाहता त्यांची 'जात' पाहिली जाते. त्यामुळे जात ही समाजमनावर परिणाम करत आहे. व्यक्तीची प्रतिष्ठा निर्माण करणे व ती प्रतिष्ठा कायम ठेवण्यासाठी संविधानातील मूल्ये आवश्यक आहेत. रोजगार, सामाजिक, राजकीय संदर्भ बदलले असून ती पुन्हा प्रस्तावित करावी लागतील. यासाठी विचार मंथनातून प्रत्यक्ष कृती कार्यक्रम करण्यावर भर दिला पाहिजे.

# वंचित गावांना नियोजनबध्द व त्वरित पाणी सोडा : सुनिल पवार

## शिष्टमंडळाने घेतली जिल्हाधिकारी यांची भेट

**जत :** खलाटी पंपहाऊस ब अंतर्गत येणार्या गावांना नियोजनबध्द रित्या पाणी सोडावे या मागणीसाठी राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष अरविंद गडदे, जत तालुका अध्यक्ष सुनील पवार यांच्यासह तालुक्यातील शेड्याळ, वळसंग, पाच्छापूर, सोरडी, रावळगुंडवाडी, खोजनवाडी, येळवी या गावचे सरपंच, उपसरपंच, ग्रामस्थानी जिल्ह्याचे पालकमंत्री सुरेश खाडे, खासदार संजयकाका पाटील, जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी व जत तालुक्याचे तारणहार म्हैसाळचे अभियंता इंजी.सचिन पवार, इंजी.खरमाटे यांची भेट घेत निवेदने दिली.

खासदार संजय काका पाटील यांनी जत तालुक्याच्या शिष्टमंडळासाठी दोन तासाचा वेळ देत सर्व अधिकाऱ्याना



वंचित राहीलेल्या गावांना पाणी देण्याच्या सूचना दिल्या. येळवी वाढीव पाईपलाईन करण्याचेही तोंडी आदेश दिले व शेड्याळपासून बिळूरपर्यंत पाणी सोडण्याचेही नियोजन केले.

यावेळी शेड्याळचे सरपंच भगवानदास केंगार, अशोककाका जाधव, विद्याधर जाधव, रखमाजी केंगार, सोरडीचे सरपंच तानाजी पाटील, सरपंच मोहनराव गायकवाड, वळसंगचे सरपंच रमेश माळी व सहकारी, खोजानवाडीचे गुरू बसर्गी व सहकारी, रावळगुंडवाडीचे प्रभुआण्णा मोकाशी, पाच्छापूरचे सरपंच विनोद जाधव, येळवीचे समाधान जगताप, भाऊसाहेब कदम, लोहगावचे दिपक पाटील उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी दयानिधी, खासदार संजय पाटील, इंजी.सचिन पवार यांनी शेड्याळपासून वंचित राहीलेल्या सर्व गावांना पाणी देण्याचे आश्वासन दिले व शेतकर्यांच्या इतर समस्या जाणून घेत त्या सोडविण्याची ग्वाही दिली.

# फलटण शहर पोलिस ठाणे येथे पोलिस निरीक्षक हेमंतकुमार शहा यांची नियुक्ती

**फलटण :** सातारा जिल्हा पोलिस दलांतर्गत बदल्यांमध्ये जिल्हा पोलिस प्रमुख समीर शेख यांनी फलटण शहर पोलिस ठाणे प्रभारी पोलिस निरीक्षक सुनिल शेळके यांची खंडाळा पोलिस ठाणे प्रभारी म्हणून बदली केली असून त्यांच्या जागेवर सातारा शहर पोलिस ठाणे प्रभारी पोलिस निरीक्षक हेमंतकुमार कुमारपाल शहा यांची नियुक्ती केली आहे.

स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून सन १९९५ मध्ये पोलिस उप निरीक्षक म्हणून महाराष्ट्र पोलीस दलात दाखल झालेल्या हेमंतकुमार शहा यांनी त्यापूर्वी राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर येथून बी. एस. सी. आणि दयानंद लॉ कॉलेज, सोलापूर येथून एल. एल. बी.(जनरल) या पदव्या घेतल्या आहेत.

पोलिस दलात दाखल झाल्यापासून गेल्या २८ वर्षात



त्यांनी मुंबई, सोलापूर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, ईचलकरंजी, सातारा, गडचिरोली पोलिस ठाण्यांच्या माध्यमातून उत्तम काम केले असून त्याची दखल घेऊन सन २०११ मध्ये त्यांना पोलिस महासंचालकांचे सन्मान चिन्ह देवून गौरविण्यात आले आहे.

सन २०१३ पासून पोलीस निरीक्षक म्हणून त्यांनी सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यात काम केले आहे.

पोलिस निरीक्षक हेमंतकुमार शहा यांची कामकाज पद्धती अत्यंत उत्तम, शिस्तबध्द आणि कायद्याच्या पूर्ण अभ्यासातून तयार झालेली असल्याने त्यांचा गुन्हेगारांवर नेहमी वचक राहिला आहे. एमपीडीए कायद्याविषयी त्यांनी सखोल अभ्यास केला असून झोपडपट्टी दादा, अवैध धंदे करणारे विशेषतः अंमली पदार्थ व्यवसायातील सुमारे ६० पेक्षा अधिक गुन्हेगारांवर त्यांनी कारवाई करुन यापूर्वीच्या पोलिस ठाणे हद्दीतील अवैध धंदे बंद करण्यात चांगले यश मिळविले आहे. एमपीडीए कायद्याविषयी महाराष्ट्र पोलीस अकादमी नाशिक येथे १५ पेक्षा अधिक व्याख्याने दिली आहेत, तर या कायद्यांतर्गत प्रतिबंधात्मक कारवाई या विषयावर मुंबई, पुणे, कोल्हापूर, सोलापूर, सांगली, गडचिरोली, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, अलिबाग येथे व्याख्याने दिली आहेत.

# Bigg Boss १७ चा विजेता मुनव्वर फारुकी




'बिग बॉस'च्या १७व्या पर्वाचा १०० दिवसांचा प्रवास अखेर काल संपुष्टात आला. या पर्वाचा महाअंतिम सोहळा मोठ्या जल्लोषात झाला. 'बिग बॉस १७'चा विजेता लोकप्रिय स्टँडअप कॉमेडियन मुनव्वर फारुकी झाला. तर अभिषेक कुमार हा उपविजेता ठरला. मुनव्वर, अभिषेकसह मनारा चोप्रा, अंकिता लोखंडे आणि अरुण माशेट्टी हे विजेतेपदाच्या शर्यतीत होते. पण प्रेक्षकांच्या उदंड मतांनी मुनव्वर विजयी झाला.

मुनव्वरला 'बिग बॉस १७'च्या ट्रॉफीसह ५० लाखांचा चेक मिळाला. तसेच एक क्रूीपवरळ डीशींर गाडी दिली गेली. मुनव्वरने सुरुवातीपासून दिल, दिमाग आणि दम लावला होता. त्यामुळे तो या पर्वाचा विजेता होऊ शकला. याआधी त्याने कंगना रणौतचा रिॲलिटी शो 'लॉकअप' जिंकला होता. मुनव्वरचा इथपर्यंतचा प्रवास काही सोपा नव्हता. त्याने आयुष्यात अनेक चढ-उतार अनुभवले आहेत. खडतर परिस्थितीतून आलेल्या या लोकप्रिय मुनव्वरला पहिला पगार किती मिळाला होता? जाणून घ्या

मुनव्वरला 'दाऊद, यमराज औरत' या म्युजिक व्हिडीओमुळे खऱ्या अर्थाने प्रसिद्धी मिळाली. करिअर सुरू होण्याआधी मुनव्वर एका भांड्यांच्या दुकानात काम करत होता. 'कर्ली टेल्स'ला दिलेल्या मुलाखतीमध्ये त्याने पहिल्या पगाराचा खुलासा केला होता. मुनव्वर म्हणाला होता की, माझा पहिला पगार दिवसाला ६० रुपये होता. कारण इथे दिवसानुसार तुम्हाला पगार मिळतो. दिवस संपल्यानंतर रात्री तुमच्या हातात पगार असतो. आता कदाचित दिवसाला ३०० ते ३५० रुपये पगार मिळत असेल.

त्यानंतर मुनव्वरला विचारलं की, त्या पहिल्या पगाराचं काय केलंस? तेव्हा मुनव्वर म्हणाला, ज्यांच्या घरी राहत होतो. त्यांना सगळे पैसे देऊ टाकले.

दरम्यान, मुनव्वर फारुकीचा जन्म २८ जानेवारी १९९२ रोजी गुजरातमधील जुनागडमध्ये झाला होता. कौटुंबिक समस्या व वडिलांचं आजारपण यामुळे त्याला बालपणापासून काम करावं लागलं होतं. आईच्या निधनानंतर मुनव्वरने मुंबई गाठली. त्यानंतर २०२० मध्ये मुनव्वरच्या वडिलांचं निधन झालं.



# एप्रिलनंतर उघडणार 'रवींद्र'चा दरवाजा!

## १०० कोटी रुपये खर्च; ४०-४५ टक्के नूतनीकरणाचे काम पूर्ण

**मुंबई :** मागच्या वर्षी १४ नोव्हेंबरपासून नूतनीकरणाच्या कामासाठी बंद असलेले रवींद्र नाट्य मंदिरचा दरवाजा उघडण्यासाठी रसिकांना आणखी काही काळ प्रतीक्षा करावी लागणार आहे. यंदा एप्रिल अखेरीस किंवा मेच्या सुरुवातीला नाट्यगृहाचा दरवाजा रंगकर्मी आणि रसिकांसाठी उघडणार असल्याची माहिती मिळाली आहे. प्रभादेवी येथील पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या वतीने मागच्या वर्षी रवींद्र नाट्य मंदिराच्या नूतनीकरणाचे काम हाती घेण्यात आले. १४ नोव्हेंबरला पु. ल. महोत्सव झाल्यानंतर नाट्यगृह बंद ठेवण्यात आले होते.त्यावेळी ८ मार्च २०२४ पर्यंत नाट्यगृह पुन्हा सुरू करण्याची योजना होती, परंतु काही कारणांमुळे ही डेडलाईन पुढे ढकलण्यात आल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळाली आहे. एक काम करताना समोर येणारी इतर बरीच लहान-सहान कामेही तात्काळ पूर्ण करण्यात येत असल्याने मुख्य कामांना थोडा विलंब होत आहे. याचा परिणाम नूतनीकरणाच्या संपूर्ण कामावर होणार आहे. संपूर्ण सोयीसुविधांनी सुसज्ज नाट्यगृह आणि अकादमीची इमारत रसिकांच्या सेवेत रुजू करण्याचा विचार असल्याने त्या दृष्टिने वेगात कामे पूर्ण करण्यात येत असल्याची माहिती अकादमीशी निगडीत अधिकाऱ्याकडून मिळाली आहे.

**संकुलाच्या संपूर्ण इमारतीचे आतून-बाहेरून वॉटरप्रूफिंगसह प्लॅस्टर सुरू आहे. खुल्या भागातही एक व्यासपीठ तयार करण्यात येणार आहे. मुख्य नाट्यगृहात आरामदायक आसनव्यवस्था, दिव्यांगसाठी विशेष सोय, ग्रीनरुम्स अधिक सुसज्ज, वॉशरुम्समध्ये सुधारणा, अंतर्गत सजावट, स्टेज ड्रेपरी, एलईडी स्क्रीन्स,कॉस्टिक्स नवीन करण्यात येत आहे. साऊंड सिस्टीमसाठीडिशनल व्यवस्था केली जाणार आहे. २० वर्षे जुनी वातानुकूलित यंत्रणा बदलण्यात येत आहे. वेगवेगळ्या स्तरांवरील कामे वेगवेगळ्या टप्प्यांपर्यंत पूर्ण झालेली असल्याने सरासरी ४०-४५% काम पूर्ण झाले आहे.**

### १०० कोटी रुपये खर्च...

**नूतनीकरणासाठी शासनाने प्राथमिक पातळीवर ७० कोटी रक्कम मंजूर केले असून, वाढीव ३० कोटी रुपयांना मान्यता दिली आहे. या कामावर एकूण १०० कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. नूतनीकरणावरील खर्चाचा भाग पीडब्ल्यूडीकडे आहे. १०० कोटींमधून कॉन्टिंजन्सी, जीएसटी, हँडलिंग चार्जेस असे २५ ते ३० टक्के विविध कर-शुल्क वजा केल्यानंतर उरलेली रक्कम प्रत्यक्ष खर्च केली जाते.**

# लग्न ठरवत असताना रक्तगट सारखा असावा, की नसावा? डॉक्टर सांगतात..

विवाहोत्सुक युवक युवतींच्या विवाहपूर्व शारीरिक आणि मानसिक चाचण्यांत वैद्यकीयदृष्ट्या महत्त्वाचे असे आठ गुण जुळायला हवेत.

'शुभमंगल' होण्यापूर्वी ग्रह-नक्षत्रांची कुंडली जुळवणे हा पारंपरिक प्रकार झाला. आजच्या बऱ्याच युवक-युवतींना हा पारंपरिक मार्ग पसंत असतोच असं नाही, पण भविष्यातल्या सुखी आणि निरामय आयुष्यासाठी त्यांनी आरोग्याचे गुण जुळवणे मात्र नितांत आवश्यक ठरते.

या विवाहपूर्व चाचण्या आणि समुपदेशन अनेक मान्यवर इस्पितळांत आणि वैद्यकीय प्रयोगशाळांत होऊ शकतात.

**गरज का आहे?**

विवाह झाल्यावर वधूवर एका नव्या कौटुंबिक आयुष्याची सुरुवात करतात. त्यांच्यापैकी कोणालाही विवाहपूर्व अवस्थेत असलेल्या आजारांचा त्यांच्या जोडीदाराला त्रास होऊ नये; त्यांच्या संततीमध्येदेखील काही दोष निर्माण होऊ नये, यासाठी दोघांनीही आपल्या शारीरिक तपासण्या कराव्यात.

आपल्या शिक्षणपद्धतीत लैंगिक शिक्षण दिले जात नाही. अनेक तरुणतरुणींना शरीरसंबंधांबद्दल शास्त्रीय माहिती फारशी नसते. सिनेमा, इंटरनेट, पॉर्नफिल्ममधून दिशाभूल करणारी माहिती मिळालेली असते. त्यामुळे लैंगिक समुपदेशन गरजेचे असते.

विवाहोत्तर जीवनात उभयतांनी आयुष्यभर एकत्रित राहून संसार करणे अपेक्षित असते. त्यासाठी मानसिकता निकोप असावी लागते. आपापल्या वागण्यातील दोष समजून घ्यावे लागतात. त्यासाठीसुद्धा समुपदेशनाची आवश्यकता असते.

**विवाहपूर्व चाचण्या**

लग्नाला इच्छुक युवकयुवतींच्या विवाहपूर्व चाचण्यांत खालील आठ गुण जुळायला हवेत.

१. सर्वसाधारण तपासण्या :

हिमोग्राम : हिमोग्लोबिन आणि रक्तातील लाल पेशी, पांढऱ्या पेशी आणि त्यांचे पाच उपप्रकार, प्लेटलेट यासंबंधीत काही गुणोत्तरांची (रेशो) तपासणी. या चाचण्यांमध्ये व्यक्तीला ॲनिमिया असल्याचे तर समजतेच, पण रक्तातून पसरणाऱ्या काही आजारांचे प्राथमिक अनुमानही मिळते.

मूत्रतपासणी : यात मूत्रमार्गाच्या तसेच मूत्रपिंडांच्या संदर्भात काही दोष लक्षात येऊ शकतात.

रक्तगट : याबाबत अगदी सुशिक्षित कुटुंबांमध्येही गैरसमज आहेत. मुलामुलीचा रक्तगट एक नसावा असा मोठा चुकीचा प्रवाद विनाकारण अस्तित्वात आहे.

वैद्यकीयदृष्ट्या, विवाह करणाऱ्या मुलामुलींचा रक्तगट ए, बी, ओ आणि त्यांच्या पॉझिटिव्ह, निगेटिव्ह प्रकारांपैकी कोणताही असला तरी काहीही अडचण नसते.

मात्र मुलीचा 'आरएच' रक्तगट निगेटिव्ह असेल आणि मुलाचा पॉझिटिव्ह असेल, तर त्याला 'आरएच इनकम्पॅबिलिटी' म्हणतात.

या स्थितीमध्येही दोघांनी लग्न करायला काहीच हरकत नसते; मात्र अशा जोडप्याला जेव्हा मूल होते, तेव्हा त्या अर्भकाचा रक्तगट जर निगेटिव्ह असेल, तर त्याला जन्मजात काविळीचा त्रास होऊ शकतो.

परंतु अशा वेळेस या स्त्रियांना गरोदरपणाच्या सातव्या किंवा आठव्या महिन्यात आणि प्रसूती झाल्यावर ७२ तासांच्या आत असे दोन वेळा, आरएच इम्युनोग्लोब्युलिन इंजेक्शनद्वारे दिल्यास, हा संभाव्य त्रास टळू शकतो.

साहजिकच रक्तगटाची तपासणी ही लग्न टाळण्यासाठी नसून पुढे सतर्क राहण्यासाठी असते.

रक्तघटक : काही विशिष्ट समाजगटांमधील स्त्रियांमध्ये कॅल्शिअम, जीवनसत्त्व ड, ब यांची तूटही मोठ्या प्रमाणात आढळून येते. ही तूट भरून काढणे औषधांनी सहज शक्य असते. मात्र बाळंतपणानंतर हाडे दुखणे, अस्थिव्यंगाच्या तक्रारी वाढतात.

२. जनुकीय दोषांबाबत चाचणी : लग्न करणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या शरीरातील काही जनुकांचा त्यांना होणाऱ्या संततीवर विपरीत परिणाम होऊ शकतो. यामध्ये-

थॅलसेमिया : या विकारात जनुकीय रक्तदोषांमुळे अर्भकाच्या शरीरात लाल रक्तपेशींची निर्मिती कमी होत राहते आणि त्यामुळे त्याला सतत रक्त भरावे लागते. याचे मेजर आणि मायनर असे दोन प्रकार असतात.

जर वर किंवा वधू यापैकी एकाला थॅलसेमियामेजर असेल; किंवा दोघांनाही थॅलसेमियामायनर असेल, तर त्यांना होणाऱ्या संततीला थॅलसेमियामेजर होण्याची शक्यता असते. त्यामुळे अशा प्रकारात लग्न टाळावे.

दोन-तीन पिढ्यांत जवळच्या रक्ताच्या नात्यांमध्ये विवाह झालेले असतील, तर थॅलसेमियामेजर होण्याची शक्यता बळावते. अशावेळी - कुटुंबाच्या प्रत्येक पिढीमधील व्यक्तींची वैद्यकीय माहिती घेऊन त्यांच्या रक्ताच्या चाचण्या केल्या जातात.


बहुतेक वैद्यकीय प्रयोगशाळेत थॅलसेमियाचे निदान होते. ही व्याधी जन्माला येणाऱ्या मुलामध्येही संक्रमित होते. मात्र अनेकदा जोडप्यांमध्ये हा दोष असल्याचे मुलाच्या जन्माच्यावेळीच लक्षात येते. या तपासण्या जर विवाहापूर्वीच केल्या गेल्या तर वेळीच उपचार करणे शक्य होते. थॅलसेमियामेजरची दहा हजार मुले दरवर्षी भारतात जन्मतात.

# स्वादासोबतच आरोग्याचा खजिनासुद्धा आहे पाणीपुरी

पाणी पुरीच्या पाण्यामध्ये वापरल्या जाणाऱ्या जिरे, काळे मीठ, आणि काळ्या मिरीची पूड इत्यादी मसाल्याच्या पदार्थांचे मिश्रण केवळ चविष्टच नाही, तर पाचनतंत्र सुधारणारे आहे.पाणीपुरीचे नाव काढता क्षणी आपल्या सर्वांच्याच तोंडाला पाणी सुटते. चमचमीत, आंबट गोड पाणीपुरी आवडत नाही असा मनुष्य विरळाच. पाणीपुरी हा केवळ स्वदाचाच नाही, तर आरोग्याचा देखील खजिना आहे. पण अनेकदा पाणी पुरी खाल्ल्याने पोट बिघडणे, उलट्या, जुलाब होणे, अश्या तक्रारीही ऐकू येत असतात. पण या तक्रारी पाणी पुरीमुळे नसून, त्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्याच्या खराब प्रतीमुळे आणि निम्न दर्जाची उत्पादने वापरल्यामुळे, तसेच अस्वच्छतेमुळे उद्भवित असतात. त्यामुळे पाणीपुरी घरच्याघरी बनविली गेली तर या समस्या उद्भविण्याची शक्यता ही कमी होते.हे सुद्धा वाचाघरात मनी प्लांट लावतायं?; मग या गोष्टी जाणून घ्यापोट साफ होण्यास मदत करते.

पाणी पुरीच्या पाण्यामध्ये वापरल्या जाणाऱ्या जिरे, काळे मीठ, आणि काळ्या मिरीची पूड इत्यादी मसाल्याच्या पदार्थांचे मिश्रण केवळ चविष्टच नाही,

# एथनिक जॅकेटने द्या क्लासी लूक



रंगांचे मिश्रण करून जॅकेट खरेदी करता येईल. मात्र, जॅकेट आणि मुख्य पेहराव एकमेकांना सुसंगत वाटले पाहिजे. त्यामध्ये रंग, पॅटर्नमध्ये विरोधाभास नको, अन्यथा 'फॅशन ब्लंडर' व्हायला वेळ लागणार नाही. शक्यतो सोनेरी, पांढरा, काळा, राखाडी, मोती या रंगामध्ये जॅकेट डिझाइन करून घेतल्यास अनेक प्रकारच्या पेहरावासोबत ते घालता येईल. मल्टीकलर जॅकेट टाळाच. त्यामुळे वॉर्डरोबमध्ये ऐनवेळी मिक्स अँड मॅच करण्यासाठी एखादे एथनिक जॅकेट नक्की ठेवा.ओव्हरकोटप्रमाणे वापर


एक महत्त्वाचे म्हणजे, या जॅकेटला पुढच्या बाजूला बटन्स नसतात, ते पूर्णपणे खुले असतात. त्यामुळे ते कॅरी करणे जरासे मुश्कील ठरते. खरे तर, तुमच्या मुख्य पेहरावाला वेगळा टच देण्याचा या जॅकेटचा हेतू असल्याने त्याला बटन्सचा पर्याय दिला जात नाही.जॅकेटच्या फॅशनने (गरलज्ञशीं ऋीहळेप) खूप आधीपासून आपला जम बसवला आहे. त्याच्याबरोबरीने इतर कितीही ट्रेंड येवो अथवा जावो, जॅकेटची फॅशन तशीच राहाते. मग त्याचा प्रकार वेस्टर्न असो वा एथनिक (रींहळपळल). फक्त त्याच्या पॅटर्नमध्ये बदल होत जातात. सध्या लाँग जॅकेटची फॅशन जबरदस्त लोकप्रिय होताना दिसतेय. यामध्ये पाश्चात्य ड्रेसिंगसाठीचे विविध पर्याय आहेतच; शिवाय पारंपरिक आणि फ्युजनची चलतीही जास्त आहे.हे सुद्धा वाचापेपर ज्वेलरी ने खुलवा सौंदर्यलग्नसोहळ्यामध्ये हटके काहीतरी

जीन्सवर शॉर्ट किंवा गुडघ्यापर्यंतचे जॅकेट बऱ्यापैकी घातले जातात. सध्या जास्त ट्रेंडी ठरतंय, ते एथनिक लाँग जॅकेटचा फ्युजन प्रकार. म्हणजे घागरा किंवा अनारकलीवर हे जॅकेट शोभून दिसतातच, त्याचबरोबर टाइट जीन्स, पलाझो, वनपीस किंवा ट्राउझर अशा वेस्टर्न आउटफिटवरही पारंपरिक डिझाइन असलेले जॅकेट भाव खावून जात आहेत. त्यामुळे तुम्हाला पार्टी किंवा एखाद्या शानदार लग्नसोहळ्यामध्ये हटके काहीतरी पेहराव करायचा असेल, तर हे कॉम्बिनेशन नक्की घालून पाहा.पॅटर्नमध्ये विरोधाभास नको

या जॅकेटवर जर्दोसी, बांधणी, कच्छ, स्वरोवस्की, प्रिंट, एम्ब्रॉयडरी अशा विविध पद्धतीची कारागिरी केलेली असते. पूर्ण किंवा स्लिव्हलेस बाह्यांमध्ये याचे पर्याय आहेत. मुख्य पेहरावासोबत विरूद्ध रंगसंगतीमध्ये किंवा फिक्या-गडद

एक महत्त्वाचे म्हणजे, या जॅकेटला पुढच्या बाजूला बटन्स नसतात, ते पूर्णपणे खुले असतात. त्यामुळे ते कॅरी करणे जरासे मुश्कील ठरते. खरे तर, तुमच्या मुख्य पेहरावाला वेगळा टच देण्याचा या जॅकेटचा हेतू असल्याने त्याला बटन्सचा पर्याय दिला जात नाही. त्याला फिटिंगसाठी योग्य ठिकाणी टक्स आणि कट्स दिले असल्याने ते तुमच्या शरीरयष्टीला तंतोतंत बसतात. ओव्हरकोटप्रमाणे त्याचा वापर केला जातो. जॅकेटच्या पेहरावासोबत कमीत कमी क्सेसरी घाला. मोकळे केस आणि लांब कानातले किंवा स्टेटमेंट ज्वेलरी यावर छान दिसेल. उंच मुलींना हे ड्रेसिंग छान दिसतं, यामुळे त्यांच्या उंचीची शोभा आणखी वाढते, शिवाय ते लाँग जॅकेट छान कॅरीही करू शकतात.

# वयानुसार बदला फॅशन; वापरा या गोल्डन टिप्स



तुम्हाला कोणत्या प्रकारचे कपडे आणि आउटफिटप-ासून दूर राहायचे आहे. वाचा सविस्तरजर आपण वयाची चाळीशी पार केली आहे पण आपण अजूनही तारुण्यातच असल्यासारखे दिसतात. तरीही आपम आपल्या वयानुसार आपल्या फॅशनमध्ये थोडाफार बदल करणे अपेक्षित आहे. तेव्हा लक्षात ठेवा की, तुम्हाला कोणत्या प्रकारचे कपडे आणि आउटफिटपासून दूर राहायचे आहे.१. वयाच्या चाळीशीनंतर आपल्या पायांचे वजन कमी करण्यासाठी खूप मेहनत घ्यावी लागते. यामुळे मिनी स्कर्ट आणि घट्ट लेदर पँट घालू नका. आपल्या पायांचा आकार दिसेल असे कपडे घालणे टाळा. २. कधीही ग्लिटर वापरु नका. मग ते मेकअप असो वा कपडे.३. खूप टाईट कपडे वापरु नका. पण योग्य फिटींगवाले कपडे घाला. अगदी ढिले कपडे आपल्यावर शोभून दिसणार नाही.४. लक्षात ठेवा, वेव्ही कपडे आणि चंकी ज्वेलरी आपल्यावर शोभून दिसणार नाही. यासाठी साधी आणि सुंदर ज्वेलरी घाला.

# जेवणानंतर लगेच फळं खावी का?

जेवणानंतर तुम्ही लिंबूवर्गीय फळे खाता का? संत्रा, लिंबू, द्राक्ष ही सर्व आंबट फळे आहेत जी त्यांच्या उत्कृष्ट चवसाठी ओळखली जातात. यामध्ये व्हिटॅमिन सी मोठ्या प्रमाणात असते. हे एक शक्तिशाली अँटी-ऑक्सिडेंट आहे जे रोगप्रतिकारक शक्तीला समर्थन देते आणि कोलेजन वाढविण्यास देखील मदत करते.

आंबट फळे जरी अगणित फायदे देत असली तरी जेवणानंतर आंबट फळे खाणे चांगले नाही. येथे आम्ही तुम्हाला जेवणानंतर आंबट फळे खाण्याचे काही दुष्परिणाम सांगत आहोत जे तुम्ही नेहमी लक्षात ठेवावे.

लिंबूवर्गीय फळांचे फायदे काय आहेत?

लिंबूवर्गीय फळांमध्ये आहारातील फायबर असते, त्यामुळे ते बद्धकोष्ठता दूर करतात आणि पोट निरोगी ठेवतात आणि पचन बरोबर ठेवतात. यामध्ये असलेले व्हिटॅमिन्स आणि अँटीऑक्सिडंट्स शरीराला निरोगी ठेवण्यासाठी खूप मदत करतात. पण जेवणानंतर ते खाणे योग्य मानले जात नाही.

**१. ॲसिड समस्या**

लिंबूवर्गीय फळे आम्लयुक्त असतात आणि दुपारच्या जेवणानंतर लगेच त्यांचे सेवन केल्याने काही लोकांच्या पचनक्रिया बिघडू शकतात. ॲसिडिटीमुळे अस्वस्थता, अपचन किंवा छातीत जळजळ होऊ शकते, विशेषत: ॲसिड रिफ्लक्सचा त्रास असलेल्या लोकांनी हे करणे टाळावे.

**२. पोटदुखी**

जेवणानंतर लिंबूवर्गीय फळे खाताना काही लोकांना पोटदुखी किंवा गॅस यांसारख्या समस्या जाणवू शकतात. विशेषत: जर त्यांची पचनसंस्था संवेदनशील असेल. त्यामुळे अशा लोकांनी चुकूनही जेवणासोबत आंबट फळांचे सेवन करू नये.

शक्यतो अन्न खाल्ल्यानंतर फळे खायची असतील, तर लक्षात ठेवा की अन्न खाल्ल्यानंतर लगेच फळे खाऊ नका. जेवण आणि फळांमध्ये थोडे अंतर ठेवण्याचा प्रयत्न करा, अन्यथा तुम्हाला जास्त गरम होणे किंवा अपचन यासारख्या तक्रारी उद्भवू शकते.